**उलटतपास वादीतर्फे वकील श्री. एच.व्ही. गायकवाड यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

३. हे म्हणणे खरे आहे की, सदर दावा हा मनकरणाबाई हिने अंतेश्वर विरुध्द दाखल केला आहे. मनकरणाबाई हिचा दावा मिळकतीत कितवा हिस्सा आहे हे मी सांगू शकत नाही. मनकरणाबाई हिच्या भावाचे नाव व्यंकट आणि अंतेश्वर आहे. अंतेश्वरच्या वडीलांना किती बहिणी होत्या हे मला माहीत नाही. अंतेश्वरला एक मुलगा नामे गंगाधर आणि मुलगी नामे मुन्नाबाई आहे. मुन्नाबाईचे लग्न झाले असून तिच्या नवऱ्याचे नाव संग्राम आहे. संग्रामला दोन मुले असून त्यांचे नाव मला माहीत नाही. अंतेश्वरचे लग्न कधी झाले हे मला आठवत नाही. व्यंकटचे लग्न मी लहान असताना झाले. अंतेश्वरच्या बहिणी अंतेश्वरपेक्षा मोठ्या आहेत. अंतेश्वरच्या बहिणींच्या लग्नावेळेस मी १६ ते १७ वर्षांचा होतो. अंतेश्वर व व्यंकटच्या लग्नाअगोदर त्यांच्या बहिणींचे लग्न झाले होते. बहिणींमध्ये सर्वात मोठी मनकरणाबाई तिच्यानंतर केवळबाई व शिवम्मा आहेत.

**प्रश्न-** मनकरणाबाई हिने अंतेश्वरविरुध्द वाटणीचा दावा दाखल केला आहे हे तुम्हाला माहिती आहे का?

**उत्तर-** मनकरणाबाई सध्या जिवंत नाही. तिची सवत सुशिलाबाई हिने दावा दाखल केला आहे.

४. दावा दाखल करताना मनकरणाबाई होती किंवा नव्हती याबाबत मला माहीती नाही, कारण मी तेव्हा त्यांच्यासोबत नव्हतो. अंतेश्वरने मला सुशिलाबाई हिने दावा दिल्याचे सांगितले. मी वादीचा फोटो कधी पाहिलेला नाही. मनकरणाबाई किती तारखेला मयत झाली हे मला माहीत नाही. मी १६ वर्षांचा असताना मनकरणाबाईच्या अंत्यविधीला गेलो होतो. मनकरणाबाई मयत होऊन किती वर्षे झाली हे मला आठवत नाही. माझा सद्या वय ६१ आहे. मनकरणाबाई ही लग्ना झाल्यानंतर ५ ते ६ महिन्यानंतर ती मयत झाली. मी मनकरणाबाईच्या लग्नाला मी गेलो नव्हतो. मनकरणाबाईचे लग्नामध्ये वय किती होते हे मला माहिती नाही. माझे व मनकरणाबाई हिचे वय एकच होते किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. सुशिलाबाई ही कोणाची मुलगी आहे आणि कुठल्या गावची आहे हे मला माहिती आहे. सुशिलाबाई हीला दोन मुले व चार मुली आहेत. सुशिलाबाईच्या दोन मुलांची नावे सुरेश आणि शंकर आहेत. मुलींचे नावे मला आठवत नाहीत. मी सुशिलाबाई हिच्या लग्नाला गेलो नव्हतो. सुशिलाबाई गावातच असल्यामुळे मला तिच्याबाबत माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, मनकरणाबाई ही सोमनाथ

करवंदेची बायको आहे. हे म्हणणे खरे नाही की, मनकरणाबाई ही जिवंत असताना ती मयत असल्याचे मी अंतेश्वरच्या सांगण्यावरुन खोटे सांगत आहे. मनकरणाबाई ही मयत झाल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालयात आहे किंवा नाही हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला कोर्टात येऊन साक्ष देण्याची सवय आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी एक प्रकरण कोर्टात चाळीस ते पन्नास लोकांविरुध्द दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रकरणात अंतेश्वर मला मदत करत आहे म्हणून मी त्याच्या सांगण्यावरुन आजरोजी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खोटा असून मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2025.08.14 15:46:25 +0530

दि.१२/०८/२०२५

(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.